Circular.docx


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


जा.क्र. आस्था-२/233

दिनांक : १४.०१.२०२२

17

## परिपत्रक

**विषय : अधिकारी / कर्मचारी यांची प्रकरणे / विहित अर्ज / प्रस्ताव वेळेत वरिष्ठ कार्यालयात सादर करणे बाबत...**

सर्व नियंत्रण अधिकारी / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, अधिकारी, कर्मचारी यांनी केलेले विविध अर्ज / प्रस्ताव / आस्थापना विषयक प्रकरणे विहिती मार्गाने वरीष्ठ कार्यालयास वेळेत दाखल होणे आवश्यक आहे, परंतू असे निदर्शनास आले आहे की, काही अधिकारी, कर्मचारी यांनी केलेले विविध अर्ज / प्रस्ताव / आस्थापना विषयक प्रकरणे हे दोन ते तीन महिन्यापर्यंत संबंधीत कार्यालयाकडेच असतात व ते विलंबाने वरीष्ठ कार्यालयाकडे पाठवले जातात, त्यामुळे सदर प्रकरणी निर्णय घेण्यास विलंब होतो व संबंधीताचे नुकसान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच त्यांच्या मनामध्ये प्रशासनाविषयी नकारात्मक भावना निर्माण होते.

करीता सर्व नियंत्रण अधिकारी व कार्यालय प्रमुखांनी ०७ दिवसाचे आत अधिकारी, कर्मचारी यांनी केलेले विविध अर्ज / प्रस्ताव / आस्थापना विषयक प्रकरणे योग्य माध्यमाव्दारे कुलसचिव कार्यालयास पोंचण्याच्या दृष्टीने संनियंत्रण ठेवावे केवळ अर्ज/प्रस्ताव/आस्थापना विषयक प्रकरणे अग्रेषित करण्यासाठी लागलेला विलंब हा प्रशासकीय गतिमानतेच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. प्रकरणी संबधीत कार्यासनांचा वेळोवेळी आढावा घ्यावा व काही प्रकरणे प्रलंबीत असतील तर संबधीताविरुध्द प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करावी. तसेच विलंबाच्या अनुषंगाने एखाद्या कर्मचाऱ्याचे/अधिकाऱ्याचे वैयक्तिक किंवा कार्यालयीन नुकसान झाल्यास संबंधीतास जबाबदार धरुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने...

14/1/22

(धिरजकुमार रा. कदम)

**कुलसचिव**

प्रतिलिपी :

१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव
२. सर्व कार्यालय प्रमुख

प्रत :

१. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.
२. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव